२३. मामाची आमराई



- ऐका. म्हणा.

उन्हाळ्याची सुट्टी लागली.
कैलासमामाचा फोन आला.
आम्ही मामाच्या गावी गेलो.
मामाने आमराईत नेले.
हिरव्यागार कैऱ्या पाहिल्या.
तोंडाला पाणी सुटले.
मामाने हे ओळखले.
छानछान कैऱ्या तोडल्या.
कैऱ्या कापल्या.
फोडींना तिखटमीठ लावले.
आम्ही आवडीने कैऱ्या खाल्ल्या.

- पाहा. ऐका. म्हणा. वाचा.

कैरी

फोडी

- शब्द ऐका. सारख्या अक्षरांस गोल करा. वाचा.

औ त ष ध	ऐ ट दा र क णे	कै ला स री	मा क ळ

- ऐका. म्हणा.

औ ऐ कै ळ

- पाहा. ऐका. समजून घ्या. वाचा.

कै	ै	क

- ै हे चिन्ह गिरवा. शब्द ऐका. वाचा.

शैला, चैन, मैना, फैलाव, थैली, कैलास, कैरी.

- **अक्षरे जुळवा. शब्द बनवा. वाचा.**

  उदा., चटणी, शेव.

ओ फु डा न
औ ब चि स त
ए पा शे ड गा ट
ऐ णी बा व च

कै के की
णू जा री
पै र से धू

- **पाहा. गिरवा. लिहा. वाचा.**

ए ..... अॅ ..... ऐ ..... ओ ..... ऑ ..... औ .....

- **खालील चित्रांची नावे पूर्ण करा.**






.....ण..... .....प..... .....शेप..... .....ट..... .....ढा.....

.....से..... .....त..... .....डका..... .....गाडी..... .....टा.....

- **पाहा. ऐका. म्हणा. सांगा.**

8SKZAL

शिक्षकांसाठी : या पाठापर्यंत झालेल्या अक्षरांना 'ॅ' हे चिन्ह जोडून अक्षरे फलकावर लिहावी. वाचून दाखवावी. विद्यार्थ्यांकडून वाचून घ्यावी. मामा कसा हे वेगवेगळ्या शब्दांनी सांगितले आहे. याप्रमाणे विद्यार्थ्यांना त्यांचा मित्र कसा हे विचारावे.